**केंद्र शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना (शालेय पोषण आहार) नियमवाली २०१५ च्या अंमलबजावणीबाबत....**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः शापोआ- २०१५/प्र.क्र. २२२ /एस.डी.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१६

वाचा- १) केंद्र शासनाची शालेय पोषण आहार नियमावली - २०१५
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O.No. १-६/२००९/Desk (MDM) , दि. ०८/१०/२०१५
३) शिक्षण संचालक (प्राथ.) यांचे पत्र क्र.प्राशिसं/शापोआ/२०१५/असुभनिय /१४८१९/१४१५४/ ३०३/७६२१, दि. २३/१२/२०१५

**शासन परिपत्रक -**

मध्यान्ह भोजन योजनेचा (शालेय पोषण आहार योजना) समावेश राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मध्ये करण्यात आला आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाने मध्यान्ह भोजन योजना (शालेय पोषण आहार योजना) नियमावली २०१५ प्रसिध्द केली आहे.

२. सदर नियमावलीतील तरतूदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**२.१)** शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, मदरसा, मक्तबा (सर्व शिक्षा अभियान सहायित) येथे ६ ते १४ वयोगटातील इ. १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या व उपस्थित असणाऱ्या प्रत्येक विदयार्थ्यास प्रत्येक शालेय दिवशी (शाळेच्या सुट्टी व्यतिरिक्त) पोषण मुल्य युक्त मोफत आहार दिला जावा.

**२.२) आहार वाटपाची जागा :-**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शिजविलेल्या आहाराचे वाटप केवळ शाळेतच करावे.

**२.३) आहार शिजविणे आणि आहाराचा दर्जा व गुणवत्ता राखणे :-**

२.३.१) शालेय पोषण आहार केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिजविण्यात यावा.

२.३.२) प्रत्येक शाळेमध्ये आरोग्यदायी व चविष्ट आहार शिजविण्याची सुविधा उपलब्ध करावी. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी भागामध्ये आवश्यकतेनुसार केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत आहार शिजवून त्याचे वाटप शाळेतच करण्यात यावे.

२.४) अन्न सुरक्षा कायद्यातील तरतूदीनुसार मध्यान्ह भोजन योजनेची अंमलबजावणी होत आहे किंवा कसे, याचा आढावा राज्यस्तरीय संनियंत्रण समितीने घ्यावा. तसेच, सदर समितीने आहाराची पोषण मुल्ये व गुणवत्ता राखण्यासाठी यंत्रणा निर्माण करावी.

**२.५) शालेय व्यवस्थापन समितीचे कार्य:-**

२.५.१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार शालेय पोषण आहार योजनेच्या संनियंत्रणाची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आली आहे. तसेच, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा, गुणवत्ता व आहार शिजविण्यात येणाऱ्या जागेच्या साफसफाई बाबत नियंत्रण शाळा व्यवस्थापन समितीने ठेवावे.

२.५.२) शालेय पोषण आहार योजना सुरळीतपणे चालू राहण्यासाठी योजनेत खंड पडू नये म्हणून शाळा स्तरावर कोणत्याही बाबीसाठी उपलब्ध असलेला निधी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात मध्यान्ह भोजन योजनेसाठी वापरण्याचे अधिकार शाळेच्या मुख्याध्यापकास/मुख्याध्यापिकेस राहतील. मध्यान्ह भोजन योजनेचा निधी प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्यात आलेली रक्कम शाळेच्या खात्यामध्ये जमा करुन प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**२.६) प्रयोगशाळेकडून तपासणी :-**

२.६.१) विद्यार्थ्यांना शिजवून दिल्या जाणाऱ्या आहाराची तपासणी शासकीय प्रयोगशाळा किंवा शासनमान्य प्रयोगशाळेकडून करण्यात यावी. सदर प्रयोगशाळा शिजविलेल्या अन्नाचे मूल्यांकन करेल व राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-२०१३ मधील नियम क्र. २ नुसार आहाराचा दर्जा व गुणवत्ता आहे अथवा नाही याबाबत प्रमाणपत्र देईल. अन्न व औषध प्रशासन विभाग आहाराचा दर्जा व गुणवत्ता याबाबत खात्री करण्याकरिता शिजविलेल्या अन्नाचे नमुने गोळा करेल.

२.६.२) वरील २.६.१ मध्ये नमूद केलेल्या विभागाने याद्दच्छिक (Random) पध्दतीने निवड केलेल्या शाळा आणि केंद्रिय स्वयंपाकगृहांकडून दर महिन्यातून एकदा शिजविलेल्या आहाराचे नमूने गोळा करुन ते प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवावेत.

**२.७) अन्न सुरक्षा भत्ता --**

२.७.१) जर इंधन, भाजीपाला उपलब्ध न झाल्यास, स्वयंपाकी /मदतनीस अनुपस्थित असल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव शाळेच्या दिवशी शाळेमध्ये मध्यान्ह भोजन न दिल्यास प्रत्येक विदयार्थ्यास "अन्न सुरक्षा भत्ता" खालीलप्रमाणे नमूद केलेल्या पध्दतीनुसार पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत देण्यात यावा.

(अ) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यास देय धान्य.

(ब) केंद्र शासनाने निश्चित केलेला अन्न शिजविण्यासाठीचा खर्च.

२.७.२) केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दतीने आहार न पुरविल्यास केंद्रीय स्वयंपाकगृहाकडून वरील २.७.१ नुसार अन्न सुरक्षा भत्ता वसूल करण्यात येईल. परंतू कोणत्याही विदयार्थ्यांने आहार स्विकारण्यास नकार दिल्यास अन्न सुरक्षा भत्ता देय होणार नाही.

२.७.३) शाळांमध्ये जर सलग तीन दिवस अथवा एक महिन्यामध्ये पाच दिवसापर्यंत मध्यान्ह भोजन उपलब्ध न केल्यास संबंधित व्यक्ति अथवा संस्थेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी.

**३.** वरिल परिच्छेद (२) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्यस्तरावर शिक्षण संचालक (प्राथमिक), जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), तालुकास्तरावर संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांची व शाळास्तरावर शाळा व्यवस्थापन समितीची राहील. बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील शाळांकरिता सदर नियमावलीच्या अंमलबजावणीची जबाबदारी शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महापालिका व संबंधित शाळा व्यवस्थापन समितीची राहील. अन्नाच्या नमून्यांच्या तपासणीबाबत आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

**४.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०२०११७०६०८०४२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2016.02.02 16:34:42 +05'30'

**( डॉ.सुवर्णा खरात )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३) मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
५) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव.

८) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई

९) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०) शिक्षणाधिकारी (प्राथ.), सर्व

११) शिक्षण निरिक्षक पश्चिम / दक्षिण /उत्तर, बृहन्मुंबई

१२) शिक्षणाधिकारी (बृहन्मुंबई), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

१३) निवडनस्ती (एस.डी.३).